www.quest.org.in
quest@quest.org

# अंगणवाडीसाठी बालशिक्षण सेवा सबलीकरण कार्यक्रम :

## शालापूर्व तयारी चाचणी

## मोजमाप पहिले : तोंडी अभिव्यक्ती : चित्रवाचन

अंगणवाडीचे नाव : तालुका

विद्यार्थ्याचे नाव : विद्यार्थ्याचा ID

प्रश्नकर्त्याचे नाव : चाचणीचा दिनांक 5 पैकी मिळालेले गुण

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : मी तुला एक चित्र दाखवणार आहे. ते कसलं चित्र आहे, त्यात काय काय दिसतय हे तू नीट बघायचं. चित्रातली माणसं काय करत आहेत ते पाहयचं आणि ती माणसं एकमेकांशी काय बोलत असतील याचा विचार करायचा. आणि मग मला चित्राबद्दाल सांगायचं.

| गुण | निकष | निरिक्षण व नोंदी |
|---|---|---|
| 0 | मुलाने चित्र पाहण्यात रस दाखवला नाही. ते चित्राबाबत काहीही बोलले नाही | |
| 1 | केवळ चित्रातील काही वस्तूंची वा व्यक्तीची नावे सांगितली.प्रश्न विचारून ही पूर्ण वाक्यात उत्तर दिले नाही | |
| 2 | चित्रात उघडपणे दिसणाऱ्या बाबी प्रश्न विचारल्यावर त्रोटक वा अर्ध्यामुर्ध्या वाक्यांत सांगितल्या.<br>उदा. 'ही मुले काय करतायत?' विचारल्यावर 'खेलत.' किंवा 'गोट्या खेलत' अशी उत्तरे दिली. | |
| 3 | चित्रात उघडपणे दिसणाऱ्या बाबींचे स्वत:हून वर्णन केले.वर्णन करताना चित्रांत दिसणारा प्रत्येक प्रसंग सुटा विचारात घेतला. प्रश्न विचारूनही चित्रापलिकडे जाता आले नाही | |
| 4 | संपूर्ण चित्र कशाचे आहे हे सांगितले. चित्रातील ठळक घटनांत कोणती पात्रे आहेत, ती काय करत आहेत हे सांगितले. थोडीशी मदत केल्यावर पात्रे काय बोलत असावीत, त्यांचे एकमेंकांशी काय नाते असेल या बाबत योग्य अंदाज केला | |
| 5 | संपूर्ण चित्रातील स्थळ, वेळ या बाबत अंदाज केला. पात्रांचे वर्णन करून परस्पर संबंध सांगितले. ती एकमेकांशी काय बोलत असतील याचा अंदाज घेऊन गोष्ट रचण्याचा प्रयत्न केला.असे तुला का वाटते ? असे विचारल्यावर कारणमिमांसा केली. चित्रात सहज न दिसणारे तपशील सांगता आले | |